IMPACT FACTOR : 4.197 (IIJIF)
ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

VOL. 6 | ISSUE 4 | AUGUST 2020

## अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दी विशेषांक



*Guest Editors*

**Dr Raju Badure | Prof. Asha Giri**

*Editor in Chief*

**Dr Kalyan Gangarde**

१९. बहुआयामी व्यक्तिमत्त्व अण्णा भाऊ साठे | श्रीमती सविता ना. रोडे | १०९

२०. साहित्यातील सामाजिक विद्रोही जाणिवेचा लोकनायक : अण्णा भाऊ साठे | बाचेवाड परसराम तु. | ११४

२१. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत अण्णा भाऊ साठे यांचे योगदान | देविदास ना. रिठे | ११७

२२. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये अण्णाभाऊ साठे यांचे योगदान | गायकवाड नरेंद्र वि.| १२२

२३. अण्णाभाऊ साठे यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान | महेश शि. जाधव | १२७

२४. संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार अण्णाभाऊ साठे | डॉ.पी.एस.लोखंडे | १३१

२५. स्त्रीवादी साहित्य आणि अण्णाभाऊंच्या नायिका | डॉ. दिलीप सांवत | १३५

२६. कर्तव्यदक्ष पोलीस आधिकाऱ्याची प्रेमकहाणी: तारा | डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे | १४१

२७. अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील नायक | विनायक जाधव | १४९

२८. अण्णा भाऊ साठे यांच्या 'आवडी' या कादंबरीतील साहित्य दर्शन | भारत चि. बंडगर | १५५

२९. अण्णा भाऊंच्या कांदबऱ्यातील स्त्री व्यक्तीरेखा |सखाराम बा.कदम | १५९

३०. अण्णा भाऊंच्या झुंझार कथा नायिका | डॉ. आशा सो. गिरी | १६६

३१. अण्णा भाऊ साठेंच्या कथेतील संघर्ष | राजेंद्र ज्ञा. मेहेत्रे | १७५

३२. अण्णा भाऊ साठे यांच्या कथेतील जीवनसंघर्ष | डॉ.शरद जे. मेश्राम | १८०

३३. स्त्री शक्तीचा सन्मान करणारा महान कथाकार अण्णा भाऊ साठे | डॉ. आनंद इंजेगावकर | १८८

३४. इनामदार:शोषितांचे आवाज बुलंद करणारे नाटक| डॉ. माधव जाधव | २०४

३५. अण्णा भाऊ यांची लोकनाटये | डॉ. संदीप बनसोडे | २०९

३६. अण्णाभाऊ साठे यांच्या निवडक पद्यरचनांचा आढावा | केदार र. केंद्रेकर | २१६

३७. पोवाडयांमधून व्यक्त होणारे अण्णा भाऊ साठे यांचे व्यक्तिमत्त्व : एक आस्वादक मांडणी | डॉ. निलेश एकनाथराव लोंढे | २२३

३८. अण्णा भाऊ साठे यांचा लोकनाटयविषयक दृष्टिकोन | बोंतेवाड ना. रामलू | २३०

२१.

# संयुक्त महाराष्ट्र चळवळीत अण्णा भाऊ साठे यांचे योगदान

**प्रा. देविदास नागोराव रिठे**
इतिहास विभाग
श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी
भ्रमणध्वनी : ९४२०१८५१३६

**प्रास्ताविक** : संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही भारतीय स्वातंत्र्य लढया नंतरची सर्वात मोठी लोकशाहीवादी चळवळ होती. या चळवळीची प्रमुख मागणी म्हणजे सर्व मराठी भाषीक प्रदेशांचा महाराष्ट्र प्रांत स्थापन व्हावा व मुंबई महाराष्ट्राला मिळावी. संयुक्त महाराष्ट्राच्या लढयात मराठी जनतेने त्यामध्ये राजकीय नेते, पत्रकार, साहित्यिक, कामगार वर्ग, शाहीर, विद्यार्थी वर्ग, सामान्य स्त्री–पुरूष यांनी मोठया संख्येने व उत्साहाने सहभाग घेतला होता. संयुक्त चळवळ करणाऱ्या मराठी लोकांवर सरकारने गोळीबार केला. त्यामध्ये १०५ हुतात्मे झाले. शेवटी १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. आज संयुक्त महाराष्ट्र चळवळ म्हंटले की प्रामुख्याने नजरे समोर आचार्य अत्रे, शाहीर अण्णा भाऊ साठे, अमर शेख ही नावे येतात. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी ज्यांनी उभा आडवा महाराष्ट्र गाजविला व पेटविला त्यामध्ये शाहिर अण्णा भाऊ साठे यांच्या लेखणीचा सिंहाचा वाटा आहे.

**संयुक्त महाराष्ट्र चळवळ :**

ब्रिटिश राजवटीत मराठी भाषिक प्रदेश तीन वेगवेगळया प्रशासकीय क्षेत्रात विभागला गेला होता.

१) मुंबई इलाका : ब्रिटिश काळात मुंबई इलाक्यात मुंबई, कोकणपट्टी तसेच काही गुजराती व कानडी प्रदेशाचा समावेश होता.

२) मध्य प्रांत : ब्रिटिश काळात मराठी व हिंदी भाषिकांचा मिळून हा प्रदेश बनलेला होता. सध्याच्या महाराष्ट्रातील विदर्भ या प्रदेशाचा त्यामध्ये समावेश होता.

३) हैद्राबाद संस्थान : ब्रिटिश काळात हैद्राबाद संस्थान निजामाच्या अधिपत्याखाली होता. मराठवाडा हा प्रदेश हैद्राबाद संस्थानातच होता. दक्षिण महाराष्ट्रात असलेल्या १६ लहान मोठया मराठी भाषिक संस्थांनावर देशी संस्थानांचीच सत्ता होती. यासर्व मराठी भाषिकांचे एकच राज्य असावे असा विचार विसाव्या शतकाच्या प्रारंभापासूनच राजकीय पुढारी, विचारवंत व साहित्यिक मांडत होते.

संयुक्त महाराष्ट्राची मागणी भाषावार प्रांत रचनेच्या मागणी इतकीच जुनी होती. प्रा. विठ्ठल वामन ताम्हणकर यांनी इ.स. १९१७ मध्ये लोकशिक्षण या मासिकात एक लेख लिहिला. त्यात मुंबई प्रांत मध्य प्रांत, वऱ्हाड आणि हैद्राबाद या संस्थानात विभागला गेलेला मराठी भाषिक भाग एकत्र आणून एक संघ महाराष्ट्राची निर्मिती करावी असा विचार मांडला. थोडक्यात सर्व मराठी भाषिक प्रदेश एकत्र आणून त्या प्रदेशाचे महाराष्ट्र हे वेगळे राज्य निर्माण करावे. यासाठी मराठी भाषिकांनी जी मागणी केली त्याला संयुक्त महाराष्ट्राची मागणी असे संबोधले जाते.

इ.स. १९२० साली नागपूर येथे झालेल्या कॉंग्रेस अधिवेशनाच्यावेळी भाषावार प्रांत रचनेचा मुद्दा महात्मा गांधी यांनी मान्य केला होता. मात्र स्वातंत्र्यानंतर कॉंग्रेस पक्षाला विशेषत: नेहरूंना भाषावार प्रांत रचना संकुचित व राष्ट्रीय एकात्मतेला धोका वाटू लागला. पण देशाच्या स्वातंत्र्यासाठी एक होऊन लढा देण्याऱ्या सर्व भाषिक राज्यांना आपल्या भाषकाचे राज्य असणे गरजेचे वाटत होते. म्हणून भाषावार प्रांत रचना व्हावी म्हणून आंदोलने सुरू झाली. प्रामुख्याने ही आंदोलने दक्षिणेत होऊ लागली.

तेलगू राज्य व्हावे यासाठी उपोषणचा मार्ग अवलंबून नंतर प्राण त्याग करणारे श्रीरामलू पोट्टी हे अखेरीस राज्य पुनर्रचना आयोग नेमण्यास कारणीभूत ठरले. त्यानंतर स्थापन झालेल्या राज्य पुनर्रचना समितीने आंध्र प्रदेश, केरळ, कर्नाटक आणि तामिळनाडू अशी राज्य स्थापन करण्याची शिफारस केंद्राला केली. त्यावेळी या समितीने मराठी व गुजराती भाषिकांचे स्वतंत्र राज्य न करता या दोहोचे मिळून एक राज्य करावे व त्याची राजधानी मुंबई असावी अशी शिफारस केली. तसेच निजामाच्या ताब्यात असलेला मराठी भाषिकांचा मराठवाडा व तत्कालीन मध्य भारतात असलेला विदर्भ याचे मिळून मराठी भाषिकांचे विदर्भ राज्य करण्याची शिफारस केली. याला विरोध करण्यासाठी सर्व पक्षीय मराठी नेते एकत्र आले. त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी समितीची स्थापना केली. या समितीचे अध्यक्ष म्हणून ब्राम्हणेत्तराचे नेते केशवराव जेधे यांची निवड करण्यात आली. या समितीत आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, एस.एम. जोशी, ना.ग. गोरे, कॉमेड डांगे, शाहीर अण्णा भाऊ साठे हे नेते होते.

या समितीने महाराष्ट्राला जागे केले. समितीचा एवढा प्रभाव पडला की त्यानंतर झालेल्या मुंबई राज्याच्या निवडणूकीत या समितीला १०१ जागा मिळाल्या. परंतु गुजरात, मराठवाडा व विदर्भातील लोकप्रतिनिधींच्या साथीने यशवंतराव चव्हाण हे व्दैभाषिक मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री झाले. त्यानंतरही संयुक्त महाराष्ट्राची चळवळ थांबली नाही. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच

पाहिजे या गर्जनेसह संपूर्ण मराठी मंडळी पेटून उठली. पुढे मुख्यमंत्री झालेल्या मोरारजी देसाई यांनी ते आंदोलन चिरडण्याचा खूप प्रयत्न केला. त्यांच्या निर्दयीपणामुळेच पोलिसांनी केलेल्या गोळीबारात १०५ जण हुतात्मा झाले. या घटनेनंतर मात्र संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे गांभीर्य वाढले. मग देसाईना हटवून यशवंतराव चव्हाण यांना मुख्यमंत्रीपद देण्यात आले. त्यानंतर १९५९ मध्ये इंदिरा गांधी कॉंग्रेसच्या अध्यक्ष झाल्या. त्यांनी परत एकदा महाराष्ट्राचा आढावा घेण्यासाठी एक समिती नेमली. या समितीने मुंबई महाराष्ट्रात सामील करायला पाहिजे असा अहवाल दिला. त्याला इंदिरा गांधी यांनी सहमती दिली. शेवटी १ मे १९६० रोजी मराठी भाषिकांचे मुंबई राजधानी असणारे महाराष्ट्र राज्य निर्माण झाले.

**अण्णा भाऊ साठे यांचे योगदान :**

भाषावार प्रांत रचनेच्या प्रक्रियेत मुंबई महाराष्ट्राला दयावी की गुजरातला दयावी यावर चर्चा सुरू झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रक्रियेवर निर्णय घेण्यासाठी पावस्कर, पण्णीकर, फाजल अली, कुंझरू या समितीचा अहवाल मागविण्यात आला. मुंबई गुजरातला जोडण्याचा कट झाला. गुजरात सहीत व्दैभाषकांचे लोंढणे महाराष्ट्राच्या गळयात अडकविण्यात आले. आणि मुंबई महाराष्ट्राच्या वाटयाला यावी यासाठी आंदोलने सुरू झाली.

संयुक्त महाराष्ट्राची समिती स्थापन झाली. त्यामध्ये महत्त्वाची व नेतृत्वाची भूमिका तत्कालीन लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची होती. महाराष्ट्रावर प्रेम असणाऱ्या अण्णा भाऊंनी सर्व शक्तीनिशी या अन्याया विरूध्द आवाज उठविला. त्यांची शाहीरी जनतेचे नेतृत्व करीत होती. संयुक्त महाराष्ट्राच्या लढयात त्यांचे मित्र शाहीर अमर शेख, शाहीर दत्तात्र्यय ना. गव्हाणकर यांनी रात्रीचा दिवस करून संपूर्ण महाराष्ट्र जागा केला. अण्णा भाऊंनी स्वत:ला संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत झोकून दिले. त्यामागे कोणताही मोह किंवा प्रलोभन नव्हते, तर त्यांच्या अंगाअंगात मुरलेली मराठी अस्मिता होती.

मुंबई प्रांत गुजरातला जोडण्याचा मणसुबा तयार झाला तेव्हा त्याला चोख उत्तर देण्यासाठी कम्युनिस्ट पक्षाच्या जन आंदोलनाच्या कार्यक्रमात अण्णा भाऊंच्या 'लाल बावटा' या कला पथकाने महत्त्वाची भूमिका निभावली. त्यातील 'माझी मुंबई' हे प्रसिध्द लोकनाटय संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या काळात गरज म्हणून तयार केले गेले. मुंबई कोणाची? ही संगीतमय जुगलबंदी लोकांना भाळून टाकत होती. तमाशाव्दारे होणारा भांडवलशाही विरूध्द लोकजागृतीचा प्रचार थांबविण्यासाठी त्यावेळच्या प्रांतीय देसाई सरकारने तमाशावर बंदी घातली. कारण अण्णा भाऊंच्या वाणी, लेखनाच्या सामर्थ्याचा जबरदस्त फटका मोरारजी

देसाई सरकारला बसत होता. त्यामुळे अण्णा भाऊंना भूमीगत सुध्दा व्हावे लाग पण शाहीरीवर बंदी आणणारे देसाई सरकार अखेर लोकनाटयाच्या औषध नमले.

अण्णा भाऊंनी 'माझी मैना गावावर राहीली' ही लोकप्रिय लावणी संयुक्त महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर लिहिली आहे. मुंबईत संयुक्त महाराष्ट्राचा लढा सुरू झाला आणि दुरवरून खेडयापाडयातून बायका, मुलांचा विरह विसरून कामासाठी मुंबईत आलेला माणूस या लढयात सामिल झाला. कारण मुंबई गुजरातला जोडण्यास भांडवलशाहीचा विजय होऊन येथील कामगार वर्गाची दैन्य अवस्था होईल याची जाणीव त्यांना झाली होती. लावणीतील मैना म्हणजेच बेळगाव उंबरगाव तसेच गोवा सहीत महाराष्ट्राची विरहीत जनता होती. या जनतेविषयी महाराष्ट्राची हळहळ म्हणजे शाहीरी मनाची काहीली अण्णा भाऊंनी उभी केली

संयुक्त महाराष्ट्रासाठी क्रांतीकारकांनी, महाराष्ट्रवीरांनी, विचारवंतानी जीवाचे रान केले. याप्रमाणेच समाज परिवर्तनाशी व राजकीय क्रांतीशी तादात्म्य ठेऊन समाजाचे चैतन्य फुलविण्याचे कार्य शाहीर करतो. तशी शाहीरी करणारे अण्णा भाऊ एक होते.

अण्णा भाऊ साठे हे एक शाहीर, लेखक, कादंबरीकार म्हणून सर्व महाराष्ट्राला परीचित झाले. अण्णा भाऊंची गीते शाहीर अमर शेख आपल्या पहाडी स्वरात लोकांसमोर सादर करीत असत. तर पोवाडयात अण्णा भाऊ मागे उभे राहून त्यांना साथ देत असत आणि स्वत:ही महाराष्ट्राचे मोठेपण सांगत असत. ''महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया। ही मायभूमि धीरांची। शासनकर्त्यां वीरांची। घामाची आणि श्रमाची। खुरप्याची आणि दोरींची। संतांची, शाहीरांची त्यागाच्या तलवारीची। स्मरूंन धुरंधर आता त्या शिवराया। महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळुन काया।''

अमर शेख अण्णा भाऊं बद्दल म्हणतात की, अण्णा भाऊ जवळ अन्यायाची चीड होती, गुलामगिरीबद्दल लढण्याची खुमखुमी होती. दु:ख, दैन्य, दारिद्रयाचा नाश करू इच्छीनाऱ्या गोळयांच कोठार होत आणि त्यांच्या मानवतावादाच्या तलवारीला समाजवादाची शास्त्रीय पध्दतीन चढवलेली धार होती. म्हणून त्यांचा पोवाडा जनमाणसात रान उठवत व पेटवत होता. संयुक्त महाराष्ट्राच्या लढयात अण्णा भाऊंनी आपली लेखनी झीजविली. वाणीचा शस्त्रा सारखा वापर केला महाराष्ट्राची आस्मिता जागती ठेवण्याचे कार्य केले. घराकडे दुर्लक्ष करून अण्णांनी लढयाला सर्वस्व वहिले होत. गावोगावी फिरून लोकांत जागृती करत महाराष्ट्र द्वेष्टयांनी आपल्या महाराष्ट्रावर केलेल्या अन्यायाची जाणीव ते लोकांना करून देत असत. लढयाला अनुकूल असे वातावरण त्यांनी तयार केले होते. १ मे

१९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आला परंतु बेळगाव, कारवार, निपाणी, उंबरगाव डांग हा सिमावर्ती भाग वगळण्यात आला. हा सिमाभाग आपल्या पासून दुरावला आहे अशी खंत ही लावणी मध्ये अण्णा भाऊंनी व्यक्त केली. त्यांचे मन फार व्यथित झाले यावर त्यांनी उपाय ही सुचविला. सर्वांनी एकजूट व्हावे. शिवशक्तीला एकतेचे आवाहन करतांना अण्णा भाऊंनी म्हटले
''आता वळू नका। रणि पळू नका।
कुणी चळू नका।
बिनी मारायची अजून राहिली।
माझ्या जीवाची होतीया काहिली ।''

**सारांश :** संयुक्त महाराष्ट्राच्या लढयाचे नेतृत्व अण्णा भाऊंनी स्विकारले होते परंतु त्यांच्या नेतृत्वाचा कधीच गवगवा झाला नाही. आज येथील संधीसाधू राजकारणी महाराष्ट्राचे श्रेय आपणाकडे घेऊन अधिपत्य गाजवत आहेत आणि खरे क्रांतीकारी महाराष्ट्रावर प्रेम करणारे पडदया आड गेले आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा इतिहास लिहितांना 'माझी मुंबई' हे एक ऐतिहासिक दस्ताऐवज म्हणून प्रत्येक मराठी माणसाने मखमली स्मरण म्हणून जपून ठेवावे. अण्णा भाऊंचा शाहीरीरूपी लढा संयुक्त महाराष्ट्र चळवळीतला अविस्मरणीय भागच नाही तर तो एक ज्वलंत इतिहासच आहे.

## • संदर्भ ग्रंथ •


१) गुरव बाबुराव : 'अण्णा भाऊ साठे समाजविचार आणि साहित्यविवेचन', प्रकाश विश्वासराव लोकवाङ्मय गृह भूपेश गुप्ता भवन ८५, सयानी रोड, प्रभादेवी मुंबई.

२) डांगळे अर्जुन, उपाध्ये नीला, नाईक वसुंधरा, सावरकर सुभाष : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

३) लालजी पेंडसे : महाराष्ट्राचे महामंथन, अभिनव प्रकाशन, १९६१.

४) संपादन प्रा. भगवान काळे : संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज.

५) संपादन प्रकाश खांडगे : गर्जा महाराष्ट्र माझा.


❑❑❑